# एमएमआरसीएलला प्रोजेक्ट एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे कार्यचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला प्रोजेक्ट मॅनेजर्स ग्लोबल समिट २०२१ च्या उद्घाटन समारंभात प्रोजेक्ट एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड प्रदान करण्यात आला आहे. यावेळी एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता, प्रणाली संचालक ए. ए. भट, वित्त संचालक अबोध खंडेलवाल या वेळी उपस्थित होते. आयपीएमएचे सदस्य व प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएट्स इंडियाचे प्रादेशिक संचालक टी. श्रीनिवासन यांनी हा पुरस्कार प्रदान केला आहे. राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या एकूण ४ प्रकल्पांमध्ये एमएमआरसीएला हा पुरस्कार मिळाला आहे. प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएटसचा वार्षिक कार्यक्रम या वर्षी व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर आयोजित करण्यात आला होता. या वर्षी ग्लोबल समिटची थीम प्रोजेक्ट मॅनेजमेंट ऑप्टिमायझेशन फॉर रिझिलियन्स अँड सस्टेनेबिलिटी होती. २३ आणि २४ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात पीएमए राष्ट्रीय पुरस्कार दरवर्षी चांगल्या प्रकारे राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांचे यश आणि कामगिरी साजरा करण्यासाठी आयोजित केला जातो. हा पुरस्कार एमएमआरसीएलसाठी एक महत्त्वाचा सन्मान असून आधुनिक अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देईल, असे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी यावेळी मत मांडले.